# ८. वाट पाहताना

– अरुण ढेरे

**शब्दार्थ –**

१) अटळ – टाळता न येण्यासारखे.

२) अद्भुत – आगळंवेगळं.

३) ओढ – आकर्षण.

४) करुणा – दया.

५) चाहूल – कानोसा, हालचालीचा आवाज.

६) डोळस – दृष्टी असलेला.

७) तृप्ती – समाधान.

८) दिंडी दरवाजा – वाड्यांच्या मोठ्या भव्य दरवाजांना असलेला लहानसा पोट दरवाजा.

९) ध्यास – तीव्र इच्छा, क्षणभरही विसरता न येणारी गोष्ट.

१०) प्रतिभा – बुद्धी.

११) मोहोर – वृक्षांना येणारा फुलांचा गुच्छ.

१२) वाळवणं – वाळवण्यासाठी उन्हात घातलेले धान्य व इतर पदार्थ.

१३) शोष – भयंकर तहान, कोरड पडणे.

१४) हमखास – खात्रीने.

१५) हुरहूरणे – चुटपुट लागणे.

१६) थैली – पोते अथवा मोठी पिशवी.

१७) पहाड – पर्वत.

१८) बिऱ्हाड – भाड्याने/भाडेकरुप्रमाणे राहणं.

१९) राघू – पोपट.

२०) रीत – पद्धत.

२१) समंजस – समजूतदार.

२२) संदेश – निरोप, सांगावा, उपदेश.

२३) संयम –निग्रह.

२४) उरुळीकांचन – हे पुणे जिल्ह्यातील एक गाव आहे. येथे गांधीवादी संस्थेचे निसर्गोपचार केंद्र आहे. त्यामुळे हे फार प्रसिद्ध आहे.

२५) पन्हं – कैरी पासून हे पेय तयार केले जाते.

२६) वाळा – ही एक औषधी वनस्पती असून पाण्यात टाकून प्यायल्यावर शरीरातील उष्णता कमी होते.

२७) हजारी मोगरा – याचे फुल झुपकेदार, मोठे, सुगंधी असते. अप्रतिम वास असलेल्या फुलला हजारी मोगरा म्हणतात. थोडं फार मोगऱ्या सारखे दिसणे आणि मादक सुगंध सोडला तर याचा मोगऱ्याशी काहीच संबंध नाही. मोगराचे फूल एकेकच असते तर हजारी मोगरा मात्र गुच्छ स्वरुपात असतो. १५–२० फुले एकत्र येऊन गुच्छ बनत असल्यामुळे 'हजारी मोगरा' नाव पडले असावे. बाकी पाने, त्यांचा रंग, त्यांची मांडणी, झाडाचा बांधा सगळंच वेगवेगळे कसलेही साम्य नसलेलं.

**वाक्प्रचार व त्यांचे अर्थ :**

१) तोंडावर येणे – जवळ येऊन ठेपणे.

२) थक्क होणे – आश्चर्यचकित होणे.

३) धीर धरणे – संयम राखणे.

४) भान विसरणे – बेभान होणे, शुद्ध हरपणे.

५) मन फुलून येणे – मन आनंदाने भरुन येणे.

६) मन न रमणे – कशातही मन न लागणे.

७) सार्थक होणे – सफल होणे. यशस्वी होणे.